जगभर

# पँडोरा पेपर्स, फेसबुक

## चन्द्रशेखर पुरन्दरे

### पँडोरा पेपर्स

२०१६ साली पनामा पेपर्स नावाचे मोठे गौडबंगाल बाहेर आले. पनामा देशात बेनामी खाती उघडून जगातील अनेक अति-श्रीमंतांनी आपला पैसा या देशात ठेवला होता. यात विविध राष्ट्रप्रमुख, त्या देशांतील उच्चाधिकारी, उद्योगपती वगैरेंचा काळा पैसा होता. त्याबरोबरच वैध मार्गाने प्रचंड पैसे मिळवणारे खेळाडू, अभिनेतेही होते. उद्देश दोन प्रकारचे - एकतर राष्ट्राच्या संपत्तीचा अपहार - उदा. देशाच्या शस्त्रास्त्रे, विमानांची आयात, खनिजांची निर्यात अशा कंत्राटात अब्जावधी डॉलर्सची लाच खाणे. तो पैसा त्या देशात जाहीर करता येत नाही कारण पैशाचा उगम सांगावा लागेल. दुसरा उद्देश म्हणजे पैशावरचा त्या देशाचा कर टाळणे. त्यासाठी जगातील कर-मुक्त प्रदेशात पैसा ठेवला जातो. स्वित्झर्लंड, पनामा, लुक्सएमबर्ग, हे देश; ब्रिटनचे ब्रिटिश वर्जिन आयलंड, केमन आयलंड हे प्रदेश कर-मुक्त आहेत. तेथे खाते उघडायला व्यक्तीची किंवा कंपनीची प्रत्यक्ष आवश्यकता नसते, पैसा कोठून व कसा आला याची चौकशी होत नाही, खात्याविषयी कमालीची गुप्तता राखली जाते. त्या पैशावर नाममात्र कर असतो किंवा कर नसतो. उदा. पनामामध्ये देशात मिळवलेल्या पैशावर कर असतो पण इतरत्र मिळवलेल्या पैशावर कर नसतो. ['आंदोलन' मे २०१६मध्ये पनामा पेपर्सचा सविस्तर आढावा घेतला आहे.]

या वर्षी याच मालिकेत नवीन गौप्यस्फोट होत आहेत. हे पँडोरा पेपर्स. विविध देशांतील वृत्तपत्रांनी एकत्र येऊन ही गुप्त माहिती बाहेर काढली. [त्यात भारतातील Indian Express]. त्यासाठी ११९ देशातील ६०० पत्रकारांनी काम केले. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून ही सुमारे सव्वा कोटी कागदपत्रे बाहेर येऊ लागली. त्यानुसार ९० देशांतील ३३० राजकारणी, वरिष्ठ लष्करी व शासकीय अधिकारी यांची नावे बाहेर अली आहेत. त्यांची बेनामी खाती व संशयास्पद मार्गाने मिळवलेला पैसा या कर-मुक्त प्रदेशातील बँकांत आहे. त्यात ३५ देशांचे आजी-माजी राष्ट्रप्रमुखही आहेत. उदा. जॉर्डनचा हुकूमशहा, चेक रिपब्लिक या लोकशाहीचा पंतप्रधान [तो भ्रष्टाचाराच्या विरुद्ध भूमिका घेऊन सत्तेवर आला होता आणि ९ ऑक्टोबरला झालेल्या निवडणुकीत त्याचा पक्ष हरला]. रशियाच्या व्लादिमीर पुतीनचे निकटवर्तीय - त्यात त्याची माजी प्रेयसी, इत्यादी अनेक. भारतातील अनिल अंबानी [त्याने ब्रिटिश कोर्टात दिवाळखोरीचा अर्ज केला आहे]. सचिन तेंडुलकर, नीरव मोदी, वगैरे.

एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, ती म्हणजे, प्रत्येक वेळी कर-मुक्त प्रदेशात पैसे ठेवणे बेकायदेशीर नसते. आताच्या यादीतील अनेकांनी आम्ही बेकायदेशीर काहीच केले नाही असा पवित्रा घेतला आहे. पण प्रत्येक कायदेशीर कृती नैतिक असतेच असे नाही. मुद्दा तो आहे. सध्याच्या कोविद महामारीच्या संकटात गरीब-श्रीमंत ही दरी निर्विवाद वाढली आहे.अशा वेळी अतिश्रीमंत मंडळी देशाचा पैसा, तोही अब्जावधी डॉलर्समध्ये परदेशी नेतात हे क्वचित प्रसंगी कायदेशीर असले तरी अनैतिक आहे. हा पैसा देशाला अशा आणीबाणीच्या वेळी कराच्या रूपाने उपलब्ध हवा. उदा.जॉर्डनच्या राजाचा बचाव असा की हा पैसा त्याचा स्वत:चा वैयक्तिक आहे, देशाचा नाही. अनेक, विशेषत: आफ्रिकन देशातील राष्ट्रपुमुखांचा पैसा तर अवैध मार्गाने गोळा झालेला आहे - वर म्हटलेले आंतरराष्ट्रीय व्यापार. हे गुन्हे आहेत आणि सद्यस्थितीत त्यासाठी हे लोक उत्तरदायी नाहीत, शिक्षा दूरच.

पैसा बाहेर नेण्याची ही तशी सरळ उदाहरणे. पण पैसा बाहेर नेला जातो आणि परत देशात आणला जातो. टोनी ब्लेअर या ब्रिटनच्या माजी पंतप्रधानाच्या पत्नीने लंडनमध्ये एक ऑफिस घेतले. त्यासाठी करमुक्त प्रदेशातील एका कंपनीमार्फत खरेदीचा व्यवहार केला. ती इमारत विकणाऱ्याची म्हणे ही पूर्व-अट होती की त्याचे देणे करमुक्त प्रदेशातील कंपनीने द्यावे. अर्थातच हा व्यवहार सरळ नाही. पंतप्रधानाची पत्नी बॅरिस्टर आहे, तोही कायदेतज्ञ आहे. अशा कर-मुक्त कंपनीचे स्वरूप त्यांना माहिती असणारच. पण सुमारे सव्वातीन लाख ब्रिटिश पाउंड्स [सव्वातीन कोटी रुपये] कर वाचवण्यासाठी त्यांनी हा मार्ग स्वीकारला. हे ब्रिटनसारख्या लोकशाहीच्या गंगोत्रीच्या पंतप्रधानाचे वर्तन.

सर्व आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार पूर्णत: पारदर्शक असावेत या दृष्टीने विकसित देशांत आता प्रयत्न चालू आहे. अर्थात कायदे कितीही कडक केले तरी त्यातून पळवाटा निघतात. तज्ज्ञ वकिलांच्या फौजा, बँकांचे सल्लागार यांच्या जोरावर तर हा खेळ आजवर चालू आहे. हे व्यवहार काही रातोरात थांबणार नाहीत. ही एक समांतर अर्थव्यवस्था आहे, ती बळकट राखण्यात बलाढ्य हितसंबंध गुंतलेले आहेत. ते निराळे जग याच पृथ्वीतलावर आहे हे पँडोरा पेपर्सने दाखवले, एवढेच त्याचे योगदान. अनेक देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त असलेला हा पैसा त्या त्या देशात परत येणे, खऱ्या विकासासाठी त्याचा विनियोग होणे अशक्य आहे.

**फेसबुक**

फेसबुक ही सोशल मीडियावरची जगातील सर्वात मोठी कंपनी आहे. तिचे मूल्य एक ट्रिलियन डॉलर्सहून अधिक आहे. [भारताचे राष्ट्रीय उत्पन्न - २.८ ट्रिलियन डॉलर्स]. एक ट्रिलियन म्हणजे एक लाख कोटी. जगातील सुमारे ३०० कोटी लोक दर महिन्याला फेसबुक वापरतात. [त्यांना फेसबुकचे सभासद म्हणू] त्यामुळे फेसबुकवर जाहिरात करणे हा प्रचंड लोकसंख्येपर्यंत पोचण्याचा मार्ग आहे. या जाहिराती दाखवण्याचा मोबदला हे फेसबुकचे प्रमुख उत्पन्न. instagram ही फेसबुकचीच कंपनी आहे.

कोणत्या प्रकारच्या सभासदगटांना कोणत्या जाहिराती दाखवायच्या याचे नियोजन असते. जाहिरातींखेरीज राजकीय हेतूंसाठीही फेसबुकचा वापर होतो. त्यात फेसबुकवर आपले अकाउंट असणे, आपले page असणे व ते page पसंत असणारे सभासद मिळवणे हा राजकारण्यांचा उद्देश असतो. जेवढे जास्त सभासद आपले page 'आवडले' असे नोंदतात, तेवढी त्या नेत्याची लोकप्रियता जास्त. त्यामुळे बोगस सभासदसंख्या वाढवण्याचा प्रयत्न होतो. यावर फेसबुक नियंत्रण करत नाही. फेसबुकला अधिकाधिक खरे/खोटे सभासद हवे असतात, मग जाहिराती तेवढ्या जास्त मिळतात आणि उत्पन्न वाढते. [आपल्याकडील Republic TV चॅनेलचा TRP अर्णव गोस्वामीने वाढवण्यासारखाच हा प्रकार]. होंडुरास नावाच्या देशाच्या अध्यक्षाने हा उद्योग केला. त्यावर फेसबुकच्या एका कर्मचाऱ्याने [सोफी झांग] हे अनेकदा वरिष्ठांच्या निदर्शनास आणले. तिने इतरही अनेक देशातील असा गैरप्रकार उघडकीला आणला. व्यवस्थापनाने त्याकडे दुर्लक्ष केले. तिला कामावरून काढून टाकले. पण २०१६च्या अमेरिकन निवडणुकात रशियाने होंडुराससारखाच प्रकार केला. त्यांनी खोटी अमेरिकन नावे घेऊन अनेक अकाउंट्स फेसबुकवर उघडली. त्यातून फेसबुकवरच्या चर्चांना त्यांना हवी तशी म्हणजे ट्रम्पला अनुकूल दिशा दिली. त्यावर गहजब अजून चालू आहे. कारण होंडुरास छोटा, अमेरिकेच्या दृष्टीने रशियाच्या मानाने बिनमहत्त्वाचा देश. त्यावरील खोटी अकाउंट्स बंद करायला फेसबुकने एक वर्ष घेतले. मेक्सिको, अझरबैजान, फिलीपिन्स या देशातही व एकूणच दक्षिण अमेरिका खंड, मध्यपूर्व, आशियातील देशात अशी खोटी अकाउंट्स केली जातात व अपप्रचारासाठी वापरली जातात. भारतात अशी ४००० अकाउंट्स आहेत. सांगायला फेसबुकचे धोरण अशा अपप्रचाराला उत्तेजन न देण्याचे असले तरी प्रत्यक्षात नफा धोरण ठरवतो.

या ऑक्टोबरला फेसबुकच्या कार्यशैलीवर बॉम्बच पडला. फ्रान्सेस हुगेन ही उच्चशिक्षित महिला फेसबुकमध्ये कामाला होती. तिने फेसबुकचे धोरण फक्त नफ्याला महत्व देते, समाजावर फेसबुक किंवा instagram मधील प्रचाराने अनिष्ट परिणाम होतो, हे अमेरिकन लोकसभेत खासदारांसमोर पुराव्यानिशी सिद्ध केले. फेसबुकच्या धोरणांनी हुकूमशहांना मदत होते, लोकशाही कमकुवत होते, तरुण पिढीवर विशेषत: विशीच्या आतल्या मुलींवर instagram मुळे चांगले संस्कार होत नाहीत, समाजातील द्वेषाला, हिंसेला खतपाणी मिळते असे गंभीर आरोप केले. उदा. म्यानमारमधील रोहिंग्या मुस्लिमांच्या हत्याकांडाला फेसबुकवरील चिथावणीखोर विधाने जबाबदार होती.

आता ती ब्रिटिश खासदारांना व युरोपिअन पार्लमेंटच्या खासदारांपुढे हे मुद्दे मांडणार आहे. वेळोवेळी या अनिष्ट गोष्टी कंपनीच्या निदर्शनाला तिने आणल्या होत्या. पण सोफी झांगसारखेच तिच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले कारण कंपनीला नफा हवा नीतिमत्ता नको. या हल्ल्यावर आता फेसबुक सारवासारव करत आहे.

कोणत्याही देशाच्या सरकारपेक्षा लोकमत घडवण्यात आज फेसबुक जास्त समर्थ आहे. त्याला आवर घालणे हा जागतिक पातळीवरचा प्रश्न आहे.

purandarearts.com
art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk